नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - २८ Issue - 28 | वार - सोमवार दि. २२ जून २०२६ Blow- Monday Date 22 JUNE 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# महिला शेतकऱ्यांना कायदेशीर दर्जा मिळणार, अधिवेशनात १० विधेयके मांडणार

## विरोधकांनी संवाद ठेवला तर चर्चेतून मार्ग काढू : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र विधीमंडळाचे पावसाळी अधिवेशन उद्यापासून (२२ जून) सुरु होणार आहे. या अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला राज्य सरकारची आज पत्रकार परिषद झाली. या अधिवेशनात आमचा प्रयत्न हा संवादाचाच आहे. विरोधकांनी संवाद ठेवला तर आम्ही चर्चेतून सगळ्या गोष्टींची उत्तर द्यायला तयार आहोत. राजकारण केलं तर राजकीय उत्तर मिळेल, समाजकारण केलं तर सामाजिक उत्तर मिळेल, हितांकरता चर्चा केली तर हितकार्य उत्तर मिळतील असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. तीन आठवडे हे पावसाळी अधिवेशन चालणार आहे. या अधिवेशनात सामान्यांच्या हिताचे निर्णय आम्ही करु असे मुख्यमंत्री म्हणाले. या अधिवेशनात १० विधेयके आम्ही मांडणार आहोत. यामध्ये महिला शेतकऱ्यांना कायदेशीर दर्जा देण्याचं विधेयक असणार आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

निवडणुका नसताना आम्ही कर्जमाफी केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिंकलो आहोत. २०२९ ची निवडणूक आहे मग २०२८-२९ मध्ये करु असे म्हणालो नाही. कर्जमाफी आमच्यासाठी राजकीय विषय नसल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. शेतकरी जगला पाहिजे. शक्ती प्राप्त झाली पाहिजे यासाठी उपक्रम म्हणून पाहातो. कुठल्याही कर्जमाफीने शेतकरी श्रीमंत झाला नाही. मात्र परिस्थिती अनुरुप कर्जमाफी करावी लागते असे मुख्यमंत्री म्हणाले. कमिटी आपण तयार केली आहे. काही निकष आपण त्यात टाकले आहेत. ही कर्जमाफी ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची आहे. ५६ लाख शेतकऱ्यांना मदत होणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

राज्यात अडचणीची परिस्थिती, एल निनोमुळं पाऊस लांबला



काही गोष्टी निश्चित आपण केल्या आहेत. बँकिंग सिस्टिमवर ताण आला आणि त्या अडचणीत आल्यात तर नागपूर वर्धा बुलढाणा सारखी बँक अडचणीत आल्याने कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या कमी झाली आहे. शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी आहे, बँकांसाठी नाही असे मुख्यमंत्री म्हणाले. आम्ही २ लाख खात्यात भरतो आहोत. आम्ही याबाबत सभागृहात आकडेवारी देईल. बहुतांश शेतकरी यात असतील. सरकार कर्जमाफी करणारच आहे, काही उपाययोजना सांगितल्या होत्या त्या केल्या आहेत. उपसमिती आपण केली, त्यात मी आणि उपमुख्यमंत्री आहेत असेही फडणवीस म्हणाले.

उपसमितीच्या माध्यमातून अडचणी येतील त्यात बदल आम्ही करु आणि निर्णय घेऊ असेही मुख्यमंत्री म्हणाले. राज्यात अडचणीची परिस्थिती तयार झाली आहे. एल निनोनं पाऊस लांबला आहे असे मुख्यमंत्री म्हणाले.

राज्यात सरासरीपेक्षा ८० टक्के कमी पाऊस पडला आहे. कोकणात ८६ टक्क्यांपर्यंत पाऊस कमी आहे. मराठवाड्यात ७९ टक्के कमी आहे. काही जिल्ह्यात पावसाचा थेंब देखील नाही. कोकणात २३ जून पासून पावसाचा जोर धरेल असे मुख्यमंत्री म्हणाले. काही प्रमाणात जोराचा पाऊस होईल. विदर्भ, मराठवाडा असेल इथे कमी किंवा मध्यम पाऊस असेल. पेरणी लायक पाऊस सर्वदूर दिसत नाही. शेतकऱ्यांनी १०० मिमी पाऊस झाल्यावर पेरणी करणं अपेक्षित आहे असे मुख्यमंत्री म्हणाले. शेतकऱ्यांनी ते पाहून निश्चित करावं. पाणीसाठा २४ टक्के आहे मागील वेळी हा ३३ टक्के होता. एकूणच आपण शेतीसाठी आवर्तन होती त्यावर बंदी घातली आहे असे मुख्यमंत्री म्हणाले. पिण्याचे पाणी राखून ठेवणं गरजेचं आहे. मान्सून लांबला तर संकट येईल. थोडी शेतकऱ्यांची नाराजी पत्करुन उपसा बंद केला आहे. बियाणांची परिस्थिती चांगली आहे असे ते म्हणाले.

# तामीळनाडूत सीफूड प्रोसेसिंग युनिटमध्ये अमोनिया गळती, सात जणांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चेन्नई : तामीळनाडूत सीफूड प्रोसेसिंग युनिटमध्ये अमोनिया गळती झाली. ही घटना तामीळनाडूतील तिरुवल्लूर जिल्ह्यात घडली. अमोनिया गळतीमुळे सीफूड प्रोसेसिंग युनिटमध्ये सात जणांचा मृत्यू झाला आणि ७० जण जखमी झाले. जखमींना जवळच्या रुग्णालयांमध्ये दाखल केले आहे.हाती आलेल्या माहितीनुसार, तामीळनाडूतील तिरुवल्लूर जिल्ह्यातल्या पेरियपालयम जवळ कनिगईपैरमध्ये 'सेंट पीटर्स पॉल सीफूड एक्सपोर्ट्स'च्या प्रकल्पात अमोनिया गळती झाली. अमोनिया गळती झाल्याचे लक्षात येताच प्रकल्प व्यवस्थापनाने अरक्कोणम येथील एनडीआरएफच्या टीमशी तातडीने संपर्क साधून घटनेची माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच अरक्कोणम येथील एनडीआरएफची एक टीम तातडीने घटनास्थळी पोहोचली. एनडीआरएफच्या सदस्यांनी त्यांच्या मुख्यालयाशी संपर्क साधून चौथ्या क्रमांकाची बटालियन घटनास्थळी तातडीने पोहोचेल अशी व्यवस्था केली. घटनास्थळी एनडीआरएफच्या मार्गदर्शनात मदतकार्य सुरू आहे.



मुख्यमंत्री सी. जोसेफ यांनी अमोनिया गळती प्रकरणी चौकशी करण्यासाठी समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. इंडस्ट्रियल सेफ्टी अँड हेल्थ विभागाचे संचालक, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सरचिटणीस आणि सार्वजनिक आरोग्य विभागाचे अतिरिक्त संचालक या तीन जणांची समिती चौकशी करून अहवाल सादर करणार आहे. समिती पुढील २४ तासांत पहिला अहवाल देईल आणि नंतरच्या तीन दिवसांत सविस्तर अहवाल सादर करणार आहे.माहिती तंत्रज्ञान मंत्री हे तिरुवल्लूर जिल्ह्यातले आहेत त्यामुळे त्यांना आणि प्रशासकीय अधिकारी के.पी. कार्तिकेयन यांना घटनास्थळाचा दौरा करून अहवाल देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. पीडितांना सरकारी नियमानुसार योग्य ती भरपाई देण्याची घोषणाही मुख्यमंत्री सी. जोसेफ यांनी केली आहे. जखमींना उपचारांसाठी आवश्यक ती मदत पुरविण्याचे आश्वासन मुख्यमंत्री सी. जोसेफ यांनी दिले आहे.

# संभाजीनगरमध्ये भीषण अपघात; एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू

संभाजीनगर : राज्यातील रस्ते अपघाताच्या घटना काही केल्या कमी होताना दिसून येत नाही. गेल्याच आठवड्यात सोलापुरात देवदर्शनासाठी गेलेल्या कुटुंबीयांच्या पिकअप वाहनाला भीषण अपघाता झाल्याची घटना घडली होती. वाहन विहिरीत पडून झालेल्या या अपघातात ७ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. आता, छत्रपती संभाजीनगरमध्ये देखील अपघाताची घटना घडली असून पैठण तालुक्यातील विवाहमांडवा-चौंडाळा रोडवर हा भीषण अपघात झाला. दुचाकी आणि पिकअप वाहनाच्या धडकेत एकाच कुटुंबातील चार जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. या घटनेनं सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पाचोड येथून आठवडी बाजार करून खंडाळा येथील पारधी वस्तीकडे परतणारे चव्हाण कुटुंब दुचाकीवरून जात असताना समोरून येणाऱ्या पिकअप वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात दुचाकीवरील दोन महिला, एक पुरुष आणि एका चिमुकल्याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून पाचोड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पुढील तपास सुरू केला आहे. अपघाताच्या घटनेनंतर स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेतली, मात्र अपघात एवढा भीषण होता की दुचाकीवरील सर्वांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती आहे.

### निकालानंतर मुख्यमंत्र्यांचा फोन, ठाकरेंबद्दलही बोलले

# एकनाथ शिंदेसाहेबांच्या नेतृत्वात काम करणार, ओमराजेंची घोषणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव : एकनाथ शिंदे साहेबांच्या नेतृत्वात काम करणार, शिवसेना पक्षात प्रवेश करतोय, अशी घोषणा खासदार ओमराजे निंबाळकर यांनी कार्यकर्त्यांच्या बैठकीनंतर बोलताना केली. धाराशिवमधील गोवर्धन वाडीत खासदार ओमराजे निंबाळकर यांनी धाराशिव जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची बैठक बोलावली होती. या बैठकीत अनेक कार्यकर्त्यांनी आपले विचार मांडले, त्यानंतर बोलताना ओमराजेंनी आपली राजकीय भूमिका जाहीर केलीय. वडिल पवनराजे निंबाळकर यांच्या हत्याप्रकरणाच्या निकालावर भाष्य केल्यानंतर राजकीय दवाबामुळे, सत्तेमुळे सर्वसामान्यांची कामे होत नाहीत, मतदारसंघातील लोकांची कामे होत नसल्याचे ओमराजेंनी म्हटलं.

मी धाराशिव लोकसभा मतदारसंघातील लोकांना भेटलो, गेले ४ तास बैठका सुरू होत्या, मी सर्वांचे मत जाणून घेतले. सगळ्याच्या कार्यकर्त्यांच्या मला सूचना आहेत, मला थोडी पार्श्वभूमी सांगायची आहे. स्थानिक स्वराज्य संस्था सगळ्या निवडणूक लढत असताना आम्हाला यश मिळाले नाही.

सामान्य नागरिकांना वेळ दिला प्रश्न सोडवले, आम्ही कामात कधी पडलो नाही?



सत्तेमुळे आम्हाला पराभव स्वीकारावा लागला, असे म्हणत आपली खंत ओमराजेंनी बोलून दाखवली.

बाळासाहेब ठाकरे, उद्धव ठाकरे आणि आदित्यजी यांचा स्नेह मला कायम लाभला. मला त्यांच्याबद्दल आजही आदर आहे, त्यांच्याबद्दल समोरुन काहीही टीका करण्यात आली, काहीही बोलण्यात आले तरी माझ्याकडून कधीच एकही शब्द उलट जाणार नाही, मी त्यांचेही आभार मानतो, असे म्हणत ठाकरे कुटुंबीयांप्रती ओमराजेंनी आपली कृतज्ञता व्यक्त केली. तसेच, यापुढे माझा राजकीय प्रवास सर्वसामान्य लोकांच्या जीवनात आनंदाचे दिवस आणण्यासाठी सुरू राहिल, असेही ओमराजेंनी म्हटले.

पवनराजे निंबाळकर खटल्यात राजकीय वैमनस्य होते हे कोर्टाने मान्य केले जाते, पण निकाल आला तो दुर्दैवी. निकालाचं दुःख आम्हाला सहन करावे लागले, एक माणूस आमच्या पाठीशी उभा होता. कोर्ट निकाल लागला, त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्याशी फोनवरून बोलणे झाले, तिथेही आम्हाला हायकोर्टात न्याय मिळावा म्हणून आम्ही सागितले, अशी माहिती ओमराजेंनी दिली.

आता महायुतीमधील शिवसेना पक्षात आलो असलो तरीही नीच प्रवृत्तीच्या लोकांचा विरोध कायम राहिल, असे म्हणत राणा जगजितसिंह पाटील यांच्याशी आपला राजकीय विरोध कायम राहिल, असेही ओमराजे निंबाळकर यांनी स्पष्ट केले.

कुठलाही पक्ष असला तरी विरोध कायम असेल, सत्तेची ताकद घेऊन काम करू, अनेक कामं आज होत नाहीत. आज सगळ्या अपेक्षांना न्याय देण्याचे काम करेन, सामान्य माणूस मला ओळखतो. पैसे, किंवा पदासाठी मी जात नाही. माझ्याकडे सामान्य माणसे आहेत, मोठी कोणी नाहीत. मी शब्द देतो, सत्तेचा वापर सामान्य माणसाचे जीवन आनंदी करण्यासाठी काम करेल. माझे काम काहीच स्वतःचे नाही, सत्तेचा उपयोग कसा केला जातो हेही दाखवून देऊ, मी बोलण्यापेक्षा मी घेतलेला निर्णय कामातून दाखवेन, असेही ओमराजेंनी म्हटले.



## संपादकीय....

### सामान्यांच्या हिताचे निर्णय

राजकारण केलं तर राजकीय उत्तर मिळेल, समाजकारण केलं तर सामाजिक उत्तर मिळेल, हितांकरता चर्चा केली तर हितकार्य उत्तर मिळतील असे मुख्यमंत्र्यांनी विरोधकांच्या बहिष्कारावरून मत व्यक्त केले. महाराष्ट्र विधीमंडळाचे पावसाळी अधिवेशन उद्यापासून (२२ जून) सुरु होणार आहे. या अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला राज्य सरकारची आज पत्रकार परिषद झाली. या अधिवेशनात आमचा प्रयत्न हा संवादाचाच आहे. विरोधकांनी संवाद ठेवला तर आम्ही चर्चेतून सगळ्या गोष्टींची उत्तर द्यायला तयार आहोत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. तीन आठवडे हे पावसाळी अधिवेशन चालणार आहे. या अधिवेशनात सामान्यांच्या हिताचे निर्णय आम्ही करु असे मुख्यमंत्री म्हणाले. या अधिवेशनात १० विधेयके आम्ही मांडणार आहोत. यामध्ये महिला शेतकऱ्यांना कायदेशीर दर्जा देण्याचं विधेयक असणार आहे. निवडणुका नसताना आम्ही कर्जमाफी केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिंकलो आहोत. २०२९ ची निवडणूक आहे मग २०२८-२९ मध्ये करु असे म्हणालो नाही. कर्जमाफी आमच्यासाठी राजकीय विषय नसल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. शेतकरी जगला पाहिजे. शक्ती प्राप्त झाली पाहिजे यासाठी उपक्रम म्हणून पाहातो. कुठल्याही कर्जमाफीने शेतकरी श्रीमंत झाला नाही. मात्र परिस्थिती अनुरुप कर्जमाफी करावी लागते असे मुख्यमंत्री म्हणाले. कमिटी आपण तयार केली आहे. काही निकष आपण त्यात टाकले आहेत. ही कर्जमाफी ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची आहे. ५६ लाख शेतकऱ्यांना मदत होणार आहे. काही गोष्टी निश्चित आपण केल्या आहेत. आम्ही २ लाख खात्यात भरतो आहोत. आम्ही याबाबत सभागृहात आकडेवारी देईल. बहुतांश शेतकरी यात असतील. सरकार कर्जमाफी करणारच आहे, काही उपाययोजना सांगितल्या होत्या त्या केल्या आहेत. राज्यात अडचणीची परिस्थिती तयार झाली आहे. एल निनोनं पाऊस लांबला आहे. राज्यात सरासरीपेक्षा ८० टक्के कमी पाऊस पडला आहे. कोकणात ८६ टक्क्यांपर्यंत पाऊस कमी आहे. मराठवाड्यात ७९ टक्के कमी आहे. काही जिल्ह्यात पावसाचा थेंब देखील नाही. कोकणात २३ जून पासून पावसाचा जोर धरेल. शेतकऱ्यांनी १०० मिमी पाऊस झाल्यावर पेरणी करणं अपेक्षित आहे पाणीसाठा २४ टक्के आहे मागील वेळी हा ३३ टक्के होता. एकूणच आपण शेतीसाठी आवर्तन होती त्यावर बंदी घातली आहे. पिण्याचे पाणी राखून ठेवणं गरजेचं आहे. मान्सून लांबला तर संकट येईल. थोडी शेतकऱ्यांची नाराजी पत्करुन उपसा बंद केला आहे.

# विद्यार्थ्यांचे जीव जात आहेत, शिक्षण व्यवस्थेच्या अपयशाला जबाबदार कोण?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

देशाच्या भवितव्याचा पाया असलेले विद्यार्थी आज भीती, नैराश्य आणि असुरक्षिततेच्या गर्तेत ढकलले जात आहेत. स्पर्धा परीक्षा, पेपरफुटी, पुनर्परीक्षा, वाढता मानसिक ताण आणि त्यातून घडणाऱ्या आत्महत्या या घटना आता अपवाद राहिलेल्या नाहीत. त्या आपल्या शिक्षण व्यवस्थेच्या गंभीर अपयशाचे प्रतीक बनल्या आहेत. अशा पार्श्वभूमीवर कॉकरोच जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अभिजीत दिपके यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लिहिलेले खुले पत्र देशातील लाखो विद्यार्थी आणि पालकांच्या वेदनेला शब्द देणारे ठरले आहे. या पत्रात अलिकडच्या काही आठवड्यांत ११ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. त्यापैकी पाच विद्यार्थ्यांचे मृत्यू अवघ्या ४८ तासांत झाले. ही आकडेवारी केवळ संख्या नाही तर ती उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबांची, तुटलेल्या स्वप्नांची आणि व्यवस्थेवरील विश्वास गमावलेल्या तरुणाईची वेदनादायी कहाणी आहे. प्रत्येक आत्महत्येमागे एका कुटुंबाचा संघर्ष, त्याग आणि मुलांच्या भविष्याविषयीच्या अपेक्षा दडलेल्या असतात.

आज शिक्षण हे गरीब आणि मध्यम वर्गीय कुटुंबांसाठी सर्वात मोठी गुंतवणूक बनले आहे. मुलांना डॉक्टर, अभियंता, प्रशासकीय अधिकारी किंवा इतर प्रतिष्ठित क्षेत्रांत पोहोचवण्यासाठी पालक कर्ज काढतात, जमीन विकतात आणि आयुष्यभराची बचत खर्च करतात. मात्र परीक्षा व्यवस्थेतील भ्रष्टाचार, पेपरफुटी आणि प्रशासकीय निष्काळजीपणामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले की या कुटुंबांवर दुहेरी संकट कोसळते. एकीकडे मुलाचे निधन आणि दुसरीकडे आर्थिक विनाश. याच पार्श्वभूमीवर दिपके यांनी आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबांना एक कोटी रुपयांची आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे.



या मागणीचा गाभा आर्थिक मदतीपेक्षा राज्याच्या नैतिक जबाबदारीशी संबंधित आहे. जर व्यवस्थेतील त्रुटींमुळे विद्यार्थ्यांचे आयुष्य उद्ध्वस्त होत असेल, तर त्याची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. केवळ शोक व्यक्त करून किंवा चौकशी समित्या नेमून शासनाची जबाबदारी संपत नाही.



**– प्रवीण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

गेल्या काही वर्षांत विविध स्पर्धा परीक्षांच्या पेपरफुटीच्या घटना वारंवार घडल्या आहेत. लाखो विद्यार्थी रात्रंदिवस अभ्यास करून परीक्षा देतात आणि नंतर पेपरफुटीमुळे पुनर्परीक्षेची वेळ येते. यामुळे केवळ वेळ आणि पैसा वाया जात नाही, तर विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि व्यवस्थेवरील विश्वासही डळमळीत होतो. मेहनतीपेक्षा गैरव्यवहाराला महत्त्व मिळत असल्याची भावना तरुणांच्या मनात निर्माण होणे ही लोकशाहीसाठी धोक्याची बाब आहे. याहून अधिक चिंताजनक बाब म्हणजे शिक्षण व्यवस्थेचे वाढते व्यापारीकरण. महागडे कोचिंग क्लासेस, वाढती फी, स्पर्धेचे प्रचंड दडपण आणि यशाला दिले जाणारे अवास्तव महत्त्व यामुळे विद्यार्थ्यांवर मानसिक ताण वाढत आहे. अनेकदा अपयश हे जीवनाचा भाग आहे हे सांगण्याऐवजी त्याला कलंक मानले जाते. परिणामी अनेक विद्यार्थी मानसिकदृष्ट्या एकाकी पडतात. आत्महत्या ही वैयक्तिक कमकुवतपणाची नव्हे, तर सामाजिक आणि संस्थात्मक अपयशाची घटना असते, हे वास्तव स्वीकारण्याची वेळ आली आहे.

दिपके यांच्या पत्रात केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणीही करण्यात आली आहे. लोकशाही व्यवस्थेत उत्तरदायित्व निश्चित करणे आवश्यक असते. मात्र केवळ एका व्यक्तीच्या बदलाने समस्या सुटणार नाही. परीक्षा प्रणाली, भरती प्रक्रिया, नियोजन यंत्रणा आणि विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याशी संबंधित धोरणांचे व्यापक पुनर्मूल्यांकन करणे तितकेच गरजेचे आहे. आज विद्यार्थी सरकारकडे केवळ नोकऱ्या किंवा परीक्षा मागत नाहीत तर ते न्याय आणि पारदर्शकता मागत आहेत. त्यांना खात्री हवी आहे की त्यांच्या मेहनतीची चोरी होणार नाही. त्यांना अशी व्यवस्था हवी आहे जिथे भ्रष्टाचाराला संरक्षण मिळणार नाही आणि प्रामाणिक प्रयत्नांना योग्य संधी मिळेल. शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास हा कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीचा पाया असतो. तोच जर ढासळला तर सामाजिक अस्थिरता निर्माण होण्याचा धोका वाढतो. विद्यार्थी आत्महत्यांकडे केवळ कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. हा सामाजिक न्याय, शिक्षणाचा अधिकार आणि मानवी प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. एखादी रेल्वे दुर्घटना किंवा पूल दुर्घटना घडली तर जबाबदारी निश्चित केली जाते. मग विद्यार्थ्यांच्या मृत्यूंच्या मालिकेनंतरही शिक्षण व्यवस्थेतील दोषींना जबाबदार का धरले जात नाही, हा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. या परिस्थितीत व्यापक सुधारणांची गरज आहे. परीक्षा प्रक्रियेत अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणा, पेपरफुटी विरोधी कठोर कायदे, दोषींवर तातडीने कारवाई, विद्यार्थ्यांसाठी मानसिक आरोग्य सहाय्य केंद्रे, मोफत समुपदेशन सेवा आणि पालकांसाठी जागृती कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. तसेच आत्महत्यांच्या घटनांचा सखोल अभ्यास करून त्यामागील सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय कारणे शोधली पाहिजेत. दिपके यांचे पत्र हे केवळ एका राजकीय पक्षाचे निवेदन म्हणून पाहण्यापेक्षा शिक्षण व्यवस्थेला विचारलेला अस्वस्थ करणारा प्रश्न म्हणून पाहिले पाहिजे.

देशाचा तरुण वर्ग जर आशाहीन झाला, तर कोणत्याही राष्ट्राचे भविष्य सुरक्षित राहू शकत नाही. विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतील स्वप्ने जिवंत ठेवणे ही केवळ पालकांची नव्हे, तर राज्याचीही जबाबदारी आहे. आज प्रश्न एकाच विद्यार्थ्याचा किंवा एका परीक्षेचा नाही. प्रश्न आहे त्या संपूर्ण पिढीचा जी आपल्या भवितव्यासाठी संघर्ष करत आहे. त्यांच्या आक्रोशाकडे दुर्लक्ष करणे म्हणजे देशाच्या भविष्याकडे दुर्लक्ष करणे होय. आता प्रश्न एवढाच आहे की विद्यार्थ्यांच्या मृत्यूंचा हिशोब कोण देणार? आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे भविष्यात असा प्रश्न पुन्हा निर्माण होणार नाही यासाठी शासन, प्रशासन आणि समाज कोणती ठोस पावले उचलणार? कारण प्रत्येक हरवलेला विद्यार्थी हा केवळ एका कुटुंबाचा नाही, तर संपूर्ण राष्ट्राचा अपूर्ण राहिलेला भविष्यकाळ असतो.

# माहितीचा हक्क की कागदी अडथळ्यांचे जाळे? माहितीचा अधिकार नियम २०२६ वादाच्या भोवऱ्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

माहितीचा अधिकार हा लोकशाही व्यवस्थेतील सर्वात प्रभावी आणि महत्त्वाचा कायदा मानला जातो.शासनाच्या कामकाजात पारदर्शकता,उत्तरदायित्व आणि नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी माहिती अधिकार कायदा २००५ लागू करण्यात आला.मात्र महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या 'महाराष्ट्र माहिती अधिकार नियम, २०२६' मधील काही तरतुदींमुळे नागरिक,सामाजिक कार्यकर्ते आणि माहिती अधिकार अभ्यासकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

**माहिती मागण्यासाठी प्रयोजन सांगणे बंधनकारक**

नव्या नियमांमधील सर्वात चर्चेचा विषय म्हणजे माहिती मागताना त्या माहितीची आवश्यकता किंवा प्रयोजन नमूद करण्याची अट घालण्यात आली आहे.माहिती अधिकार कायद्याच्या मूळ संकल्पनेनुसार नागरिकांना माहिती का हवी आहे,याचे कारण देण्याची गरज नसते.कारण माहिती ही सार्वजनिक संपत्ती मानली जाते.त्यामुळे प्रयोजन सांगण्याची सक्ती केल्यास अनेक नागरिक माहिती मागण्यापासून परावृत्त होऊ शकतात.यामुळे कायद्याच्या मूळ उद्देशालाच धक्का बसण्याची शक्यता आहे.

**अर्ज शुल्कात वाढ**

माहिती अधिकार अर्जासाठी शुल्क ₹१० वरून थेट ₹३० करण्यात आले आहे.अनेक सामान्य नागरिक,विद्यार्थी,सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामीण भागातील नागरिक ही शासकीय कामात पारदर्शकता आणण्यासाठी माहिती अधिकाराचा वापर करतात.या शुल्कवाढीमुळे आता आर्थिक अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे.माहिती मिळविण्याची प्रक्रिया स्वस्त आणि सर्वसामान्यांना परवडणारी असावी,हीच कायद्याची भावना आहे.

**माहितीच्या प्रतींसाठी वाढीव शुल्क**

माहितीचे प्रति पृष्ठ आधी शुल्क ₹२ होते ते आता थेट शुल्क ₹५ आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे.यामुळे मोठ्या प्रमाणावर माहिती मागितल्यास नागरिकांना अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागू शकतो.माहिती मिळविण्याचा खर्च वाढल्यास अनेक महत्त्वाच्या प्रकरणांमध्ये माहिती मागण्याचे प्रमाण घटण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**१५० शब्दांची मर्यादा आणि एका अर्जात एकच विषय**

नियमांमध्ये अर्जासाठी १५० शब्दांची मर्यादा आणि एका अर्जात एकच विषय घेण्याची अट घालण्यात आली आहे.प्रत्यक्षात अनेक विषय परस्पर संबंधित असतात.अशा वेळी वेगवेगळे अर्ज करावे लागल्यास नागरिकांचा वेळ,श्रम आणि पैसा अधिक खर्च होणार आहे.ही अट माहिती मिळविण्याच्या प्रक्रियेला अधिक गुंतागुंतीची बनवू शकते.

**ओळखपत्राची प्रत जोडण्याची सक्ती**

अर्जासोबत स्वयं-साक्षांकित नागरिकत्व ओळखपत्र जोडणे बंधनकारक करण्यात आले आहे.यामुळे नागरिकांच्या गोपनीयतेबाबत प्रश्न निर्माण होऊ शकतात.माहिती अधिकार कायद्याचा उद्देश प्रक्रिया सुलभ करणे हा आहे.अतिरिक्त कागदपत्रांची अट घातल्यास अनेक नागरिकांसाठी अर्ज प्रक्रिया अधिक क्लिष्ट होऊ शकते.

अपील प्रक्रियेसाठी शुल्क

प्रथम अपिलासाठी अगोदर शुल्क ₹२० होते ते आता थेट ₹५० आणि द्वितीय अपिलासाठी ₹१०० शुल्क आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे.एखाद्या विभागाने माहिती न दिल्यास नागरिकाला न्याय मिळविण्यासाठी अपील करावे लागते.अशा परिस्थितीत अतिरिक्त शुल्क आकारणे म्हणजे न्यायप्राप्तीचा मार्ग खर्चिक बनविणे असल्याची टीका होत आहे.

**विधिज्ञ प्रतिनिधित्वावर मर्यादा**

अपील प्रक्रियेत विधिज्ञ किंवा




कायदेशीर प्रतिनिधींच्या सहभागावर निर्बंध घालण्याचा प्रयत्नही वादग्रस्त ठरला आहे.अनेक वेळा गुंतागुंतीच्या कायदेशीर बाबींमध्ये तज्ज्ञ मार्गदर्शनाची गरज असते.त्यामुळे अशा मर्यादा नागरिकांच्या न्याय मिळविण्याच्या अधिकारावर परिणाम करू शकतात.

**सार्वजनिक चर्चा आणि हरकतींचा अभाव**

इतक्या महत्त्वाच्या नियमांबाबत राज्य शासनाने नागरिक,सामाजिक संस्था,माहिती अधिकार कार्यकर्ते आणि कायदेतज्ज्ञ यांच्याकडून सूचना व हरकती मागविणे अपेक्षित होते.यामुळे व्यापक सार्वजनिक चर्चा झाल्यास नियम अधिक प्रभावी आणि लोकाभिमुख होऊ शकले असते.या प्रक्रियेचा अभाव हा देखील महत्त्वाचा आक्षेप मानला जात आहे.

**लोकाभिमुख नियमावलीची गरज**

माहितीचा अधिकार हा नागरिकांना शासनावर प्रश्न विचारण्याचे आणि सार्वजनिक निधीच्या वापराबाबत माहिती मिळविण्याचे प्रभावी साधन आहे.त्यामुळे कोणतेही नियम बनविताना माहिती मिळविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ,स्वस्त आणि पारदर्शक होईल याची काळजी घेणे आवश्यक आहे.लोकशाही व्यवस्थेत माहितीचा अधिकार हा विशेषाधिकार नसून नागरिकांचा मूलभूत हक्क आहे. त्यामुळे नव्या नियमांवर व्यापक चर्चा करून आवश्यक ते बदल करणे ही काळाची गरज आहे.तसेच माहितीचा अधिकार हा केवळ एक कायदा नसून लोकशाही व्यवस्थेतील पारदर्शकता,उत्तरदायित्व आणि सुशासन सुनिश्चित करणारे प्रभावी साधन आहे.शासनाच्या कामकाजावर नागरिकांना देखरेख ठेवता यावी,सार्वजनिक निधीचा वापर कसा होत आहे याची माहिती मिळावी आणि भ्रष्टाचाराला आळा बसावा यासाठी माहिती अधिकार कायदा २००५ लागू करण्यात आला होता.मात्र महाराष्ट्र माहिती अधिकार नियम,२०२६ मधील काही नव्या तरतुदींमुळे नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे.विशेषतः माहिती मागताना त्या माहितीचे प्रयोजन सांगणे बंधनकारक करणे हे माहिती अधिकाराच्या मूळ तत्त्वांशी विसंगत वाटते.नागरिकांना माहिती का हवी आहे,याचा खुलासा करण्याची सक्ती केल्यास अनेक जण माहिती मागण्यापासून परावृत्त होऊ शकतात.तसेच अर्ज शुल्क,प्रतींचे वाढीव शुल्क,अपील शुल्क आणि इतर निर्बंध यामुळे सर्वसामान्य नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडण्याची शक्यता आहे.माहितीचा अधिकार हा नागरिकांचा हक्क आहे,तो मिळविण्यासाठी अनावश्यक अटी व निर्बंध लादणे योग्य ठरणार नाही.शासनाने नागरिक,माहिती अधिकार कार्यकर्ते,सामाजिक संस्था आणि कायदेतज्ज्ञ यांच्याशी व्यापक चर्चा करून या नियमांचा पुनर्विचार करावा.माहिती मिळविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ,पारदर्शक आणि नागरिकाभिमुख ठेवणे हीच



लोकशाहीच्या हिताची बाब ठरेल.

**– केतन दत्ताराम भोज**
घाटकोपर विभाग संघटक-
माहिती अधिकार कार्यकर्ता
फेडरेशन, महाराष्ट्र

# विक्रोळी पार्कसाईट येथे दोन दिवसांपूर्वी बनवलेल्या रस्त्यावरील गटार खचले; ट्रक अडकल्याने संताप





मनपा एन विभागाकडून नुकतेच रस्ता व गटाराचे काम पूर्ण झाल्याचे सांगितले जात असताना अवघ्या दोन दिवसांत गटार खचणे ही अत्यंत गंभीर बाब आहे.यामुळे कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सुदैवाने मोठी दुर्घटना टळली,मात्र भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी संबंधित कामाची तातडीने चौकशी करून संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर तसेच कंत्राटदारावर कारवाई करावी.तसेच वॉर्ड क्र.१२३ मधील सर्व नव्याने झालेल्या रस्ते व गटार कामांचे तांत्रिक ऑडिट करण्यात यावे,अशी आमची मागणी आहे.

**– संतोष गांजले, सामाजिक कार्यकर्ते**

विक्रोळी/केतन भोज : वॉर्ड क्र.१२३ मधील विक्रोळी पार्कसाईट परिसरात संदेश विद्यालय शाळेच्या शेजारी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एन विभागामार्फत दोन दिवसांपूर्वी तयार करण्यात आलेल्या रस्त्यावरील गटार अचानक खचल्याची घटना समोर आली आहे.गटार खचल्यामुळे त्यामध्ये एक ट्रक अडकून बसल्याने परिसरात खळबळ उडाली असून कामाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.स्थानिकांच्या म्हणण्यानुसार,संबंधित रस्त्याचे काम नुकतेच पूर्ण करण्यात आले होते.मात्र अवघ्या दोन दिवसांतच रस्त्यालगतचे गटार खचल्याने बांधकामाच्या दर्जाबाबत शंका व्यक्त केली जात आहे.महापालिकेच्या निधीतून करण्यात आलेल्या कामांमध्ये निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले गेले का,याची चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. गटार खचल्यामुळे एक मालवाहू ट्रक त्यात अडकून बसला.सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी मोठी दुर्घटना घडू शकली असती.या घटनेमुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला आणि नागरिकांना गैरसोयींचा सामना करावा लागला.स्थानिक रहिवाशांनी या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषी कंत्राटदार आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.तसेच वॉर्ड क्र.१२३ मधील अलीकडे करण्यात आलेल्या रस्ते व गटार कामांचे तांत्रिक ऑडिट करण्यात यावे,अशीही मागणी पुढे येत आहे.अवघ्या दोन दिवसांत गटार खचल्याच्या या घटनेमुळे महापालिकेच्या विकासकामांच्या दर्जाबाबत नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून,करदात्यांच्या पैशातून होणाऱ्या कामांमध्ये पारदर्शकता आणि गुणवत्ता राखली जाते का,असा सवाल उपस्थित केला जात आहे.

# विरोधकांचा चहापानावर बहिष्कार, सरकारची कर्जमाफी फसवी; शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करा,महाविकास महाविकास आघाडीची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित करण्यात आलेल्या सरकारच्या चहापान कार्यक्रमावर महाविकास आघाडीने रविवारी बहिष्कार घातला. राज्यात दुष्काळ, शेतकरी प्रश्न, महिलांवरील वाढते अत्याचार, ढासळलेली कायदा-सुव्यवस्था, वाढते अमली पदार्थांचे जाळे यांसारख्या अनेक प्रश्नांवर सरकारकडे कोणतेही समाधानकारक उत्तर नसल्याची टीका महाविकास आघाडीने केली. राज्यावर दुष्काळाचे संकट आहे. पेरण्या लांबल्या आहेत, शेतकऱ्यांसमोरील अडचणी वाढत आहे. सरकारने सुका दुष्काळ जाहीर करावा. सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी ही फसवी असून त्यात शेतकऱ्यांना अटी शर्तींमध्ये अडकवण्यात आले आहे. महायुती सरकारने शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करावा, अशी मागणी महाविकास आघाडीने पत्रकार परिषदेत केली. विधान परिषदेचे काँग्रेस गटनेते सतेज पाटील यांनी, हे सरकार ५६ टक्के कमिशन सरकार असल्याची टीका केली. राज्यात कंत्राटदारांनी अधिवेशन घेऊन कामांची बिले मिळवण्यासाठी मोठ्या प्रमाणात कमिशन द्यावे लागत असल्याचे सांगितले. कंत्राटदारांची तब्बल एक लाख कोटी रुपयांहून अधिक बिले प्रलंबित आहेत. जल जीवन मिशनच्या निधीत कपात झाली असून अनेक विकासकामे रखडली आहेत. दुसरीकडे राज्यावरील कर्जाचा बोजा साडेनऊ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याने महाराष्ट्राची आर्थिक स्थिती चिंताजनक बनली आहे, अशी टीका सतेज पाटील यांनी केली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# आषाढी यात्रा कालावधीत पंढरपूर शहरात अतिक्रमण हटाव मोहिम

## रस्ते, फुटपाथ व सार्वजनिक जागा अतिक्रमणमुक्तीसाठी पंढरपूर नगरपरिषद क्शन मोडवर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर शहरामध्ये आषाढी यात्रा कालावधीत लाखो वारकरी, भाविक व पर्यटक आगमन करीत असतात. वारकरी व नागरिकांना सुरक्षित, सुलभ व अडथळामुक्त मार्ग उपलब्ध व्हावा. तसेच वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी. यासाठी जिल्हा प्रशासन सोलापूर व पंढरपूर नगर परिषदेमार्फत शहरातील सर्व प्रमुख रस्ते, फुटपाथ, चौक, सार्वजनिक जागा व यात्रा मार्ग अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी जिल्हास्तरीय अधिकारी, कर्मचाऱ्यांचा समावेश असलेली विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी केले आहे.

त्याअनुषंगाने शहरातील सर्व फेरीवाले, हातगाडीधारक, टपरीधारक, तात्पुरते दुकानदार, व्यावसायिक तसेच नागरिकांना सूचित करण्यात येते की, सार्वजनिक रस्ता, फुटपाथ, नाला, गटार, चौक, सार्वजनिक मोकळी जागा अथवा नगर परिषदेच्या मालकीच्या जागेवर कोणत्याही प्रकारचे अनधिकृत अतिक्रमण, मालसाठा, जाहिरात फलक, बांधकाम साहित्य, शेड, टपरी, शौचालय किंवा बाथरूम किंवा इतर साहित्य ठेवू नये.

> **आषाढी यात्रेच्या पार्श्वभुमिवर वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी अतिक्रमणमुक्त पंढरपूर आणि स्वच्छ पंढरपूर करण्यात येत आहे. शहरातील नागरिक, व्यापारी, फेरीवाले व रहिवाशांनी प्रशासनास सहकार्य करून पंढरपूर शहर स्वच्छ, सुरक्षित व अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी सहकार्य करावे,**
>
> **– महेश रोकडे**
> **मुख्याधिकारी, पंढरपूर नगरपरिषद**

ज्या व्यक्तींनी अशा प्रकारचे अतिक्रमण केले असेल त्यांनी ते तात्काळ स्वतःहून काढून घ्यावे. अन्यथा महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगर अधिनियम, १९६५ तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार कोणतीही पुढील सूचना न देता अतिक्रमण



हटविण्याची कारवाई करण्यात येईल.

कारवाई दरम्यान जप्त करण्यात आलेल्या साहित्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील. तसेच अतिक्रमण हटविण्यासाठी झालेला खर्च संबंधितांकडून वसूल करण्यात येईल. या कमी झालेला खर्च संबंधितांच्या घरपट्टी मध्ये दंडासह नावे करण्याची कारवाई करण्यात येईल.

# कर्मयोगी विद्यानिकेतन मध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहामध्ये साजरा!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर येथील नामांकित शिक्षण संस्था कर्मवीर विद्यानिकेतन मध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन अत्यंत उत्साहात आणि चैतन्यमय वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये व कर्मचाऱ्यांमध्ये आरोग्य विषयी जनजागृती निर्माण करणे आणि योगाचे महत्त्व पटवून देणे हा उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या विशेष कार्यक्रमासाठी लायन्स क्लबचे प्रसिद्ध योगाचार्य श्री वसंतराव




कुलकर्णी( सर) मुख्य मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते

यांच्यासोबत योग तज्ञ व योगी शिक्षका खिस्ते आणि कोळवले मॅडम यांनी उपस्थित राहून सर्वांना मोलाचे मार्गदर्शन केले व कार्यक्रमाची सुरुवात योगाचार्यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाली यानंतर योगाचार्य वसंतराव कुलकर्णी यांनी दैनंदिन जीवनात योगाचे असणारे महत्त्व अत्यंत सोप्या शब्दात पटवून दिले. सौ खिस्ते आणि कोळवले मॅडम यांनी उपस्थित सर्वांकडून विविध योगासने प्राणायाम आणि ध्यान धारणा प्रात्यक्षिकासह करून घेतली चुकीच्या जीवनशैलीमुळे होणारे आजार योगाच्या माध्यमातून कसे दूर ठेवता येतात यावरही त्यांनी प्रकाश टाकला व श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक यांनी सर्वांना योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या याप्रसंगी शाळेच्या माननीय प्राचार्य सौ प्रियदर्शनी सर देसाई व सर्व शिक्षक शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते सर्वांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने आणि उत्साहाने या वर्गात सहभाग घेतला व शाळेच्या प्रशासनातर्फे उपस्थित सर्व मान्यवरांचे व योग तज्ञांचे आभार मानण्यात आले, तसेच शारीरिक व मानसिक स्वस्तासाठी प्रत्येकाने रोज किमान २० ते ३० मिनिटे योगा करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. संपूर्ण विद्यालयाच्या सहभागामुळे अत्यंत यशस्वी रीतीने संपन्न झाला.

# MHT-CET परीक्षेत नीरज डोंगरे यांचे यश; ८७ पर्सेंटाइल मिळवून मारली बाजी ; नागेश फाटे यांच्या कडून कौतुक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : नुकत्याच जाहीर झालेल्या MHT-CET परीक्षेच्या निकालात नीरज दिपक डोंगरे याने ८७ पर्सेंटाइल गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे. नीरजच्या या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

नीरजच्या या यशाबद्दल त्याचा सत्कार नागेश फाटे यांच्या शुभहस्ते करण्यात आला. याप्रसंगी बोलताना नागेश फाटे यांनी सांगितले की, नीरजची ही कामगिरी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून, जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर कोणतेही शिखर गाठता येते.

या आनंददायी प्रसंगी ताऊ डोंगरे, दिपक डोंगरे, भास्कर गायकवाड, कांचेश्वर बचूटे, नवनाथ फाटे, निवृत्ती पाटील आणि विनय शिंदे हे मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी नीरजच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस आणि उज्ज्वल भविष्यास शुभेच्छा दिल्या आहेत. नीरजने आपल्या यशाचे श्रेय आपल्या आई-वडिलांना आणि मार्गदर्शकांना दिले आहे.

नुकत्याच जाहीर झालेल्या MHT-CET परीक्षेच्या निकालात नीरज दिपक डोंगरे याने ८७ पर्सेंटाइल गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे. नीरजच्या या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

नीरजच्या या यशाबद्दल त्याचा सत्कार नागेश फाटे यांच्या शुभहस्ते करण्यात आला. याप्रसंगी बोलताना नागेश फाटे यांनी सांगितले की, नीरजची ही कामगिरी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून, जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर कोणतेही शिखर गाठता येते.

या आनंददायी प्रसंगी ताऊ डोंगरे, दिपक डोंगरे, भास्कर गायकवाड, कांचेश्वर बचूटे, नवनाथ फाटे, निवृत्ती पाटील आणि विनय शिंदे हे मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी नीरजच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस आणि उज्ज्वल भविष्यास शुभेच्छा दिल्या आहेत. नीरजने आपल्या यशाचे श्रेय आपल्या आई-वडिलांना आणि मार्गदर्शकांना दिले आहे.

# आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या विशेष प्रयत्नांतून सांगोला तालुक्यातील रस्त्यांसाठी ७ कोटी निधी मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





सांगोला विधानसभा मतदारसंघातील रस्त्यांच्या विकासासाठी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे ७ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. हा निधी तालुक्यातील विविध गावांमधील मुख्य रस्ते, उपरस्ते आणि खेड्यांतील जोड रस्त्यांच्या सुधारणेसाठी वापरला जाणार आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रामविकास तथा पंचायतराज मंत्री व सोलापूर जिल्हा पालकमंत्री मा.श्री. जयकुमार गोरे यांच्या कडे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी सदरचा निधी उपलब्ध करून द्यावा ही मागणी अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी केली होती. या मागणीची दखल घेत ग्रामविकास मंत्री मा.ना.जयकुमार गोरे यांनी तत्काळ निधी मंजूर केला असून निधी मंजूर केल्याबद्दल आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी मंत्री महोदयांचे आभार मानले.

सदरच्या मंजूर रस्त्यांमध्ये सांगोला तालुक्यातील (शिरभावी) मांजरी सावे इमडेवाडी रस्ता, (भोपसेवाडी) मानेवाडी रस्ता, (घेरडी) मानेवस्ती ते ग्रामा १९० रस्ता,

ढोलेमळा रस्ता ते संगेवाडी, इजिमा ५५ ते मेडशिंगी रस्ता, सोनंद मासाळवस्ती ते आगलावेवाडी रस्ता, गौडवाडी जुजारपूर गुणाप्पाचीवाडी ते वाळेखिंडी ते जि. हद्द रस्ता, हतीद ते ह. मंगेवाडी रस्ता, पाचेगांव बु. ते किडबिसरी रस्ता, कोळे ते बाणुरगड रस्ता, महुद ते (हलदहीवडी) इजिमा ९१ रस्ता, रामा १२४ ते (शिवणे म्हसोबा देवस्थान) प्र.१८२ रस्ता, शिवणे घाडगेवस्ती ते हलदहिवडी रस्ता, वाकी घेरडी निमग्रेवाडी ते कडलास रस्ता या कामांना प्रत्येकी ५० लाख असे एकूण ७ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

या निधीमुळे सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांना उत्पादन वाहतुकीसाठी मोठा फायदा होणार आहे. सध्या अनेक गावांमध्ये रस्त्यांची अवस्था खराब असल्याने शेतमाल बाजारात नेणे कठीण होत होते. या विकासकामांमुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सदरचा निधी मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, यांच्यासह ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्हा पालकमंत्री मा.ना.जयकुमार गोरे यांचे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी आभार मानले.

# निफाड पोलिसांच्या तत्पर नियोजनामुळे शांतीनगर त्रिफुलीवरील वाहतूक सुरळीत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : शांतीनगर तिराहा येथे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रस्त्याचे रुंदीकरण व काँक्रिटीकरणाचे काम सुरू असल्याने सध्या एकेरी मार्गावर दुहेरी वाहतूक सुरू आहे. त्याचबरोबर आठवडा बाजार, लग्न समारंभांची मोठी तारीख आणि शहरात वाढलेली वाहनांची संख्या यामुळे शुक्रवारी काही काळ वाहतुकीवर ताण निर्माण झाला होता.




मात्र, या परिस्थितीत पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांनी स्वतः घटनास्थळी उपस्थित राहून १० ते १२ पोलीस कर्मचाऱ्यांसह जवळपास दोन तास वाहतूक नियंत्रणाची जबाबदारी सांभाळली. वाहतुकीचे नियोजनबद्ध नियमन, वाहनांना पर्यायी मार्गदर्शन आणि सातत्याने केलेल्या प्रयत्नांमुळे मोठ्या प्रमाणावरील वाहतूक कोंडी टाळण्यात यश आले.

रस्त्याचे काम सुरू असताना, बाजाराचा दिवस आणि लग्न समारंभांची गर्दी असूनही निफाड पोलिसांनी संयमाने व कार्यक्षमतेने परिस्थिती हाताळली. त्यामुळे काही काळ वाहतूक संथ झाली असली तरी पोलिसांच्या तत्परतेमुळे वाहतूक लवकरच सुरळीत करण्यात आली.

नागरिकांनी देखील रस्त्याचे काम पूर्ण होईपर्यंत सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

रस्त्याचे काम आणि वाढलेली वाहनांची संख्या ही तात्पुरती परिस्थिती आहे. नागरिकांच्या सहकार्याने आणि पोलिसांच्या नियोजनामुळे वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत, असे पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांनी सांगितले.

# पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : मानवी जीवनाच्या समृद्धीसाठी आणि समाजाच्या शाश्वत प्रगतीसाठी आपले आयुष्य वेचणाऱ्या निस्पृह कर्तृत्वाचा आदर करणे,हे समाज म्हणून आमचे परमकर्तव्य आहे.याच उदात्त भावनेतून 'शिर्के जनकल्याण प्रतिष्ठान' अविरतपणे कार्यरत आहे.चालू वर्षातही विविध क्षेत्रांत उल्लेखनीय व मार्गदर्शक कार्य करणाऱ्या आदरणीय व्यक्ती आणि संस्थांचा सन्मान करण्यासाठी प्रतिष्ठान सज्ज झाले असून, राज्यस्तरीय पुरस्कारांसाठी अत्यंत आदराने प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.आपण किंवा आपल्या परिचयातील सुजाण व्यक्तीने शैक्षणिक, सामाजिक, क्रीडा, वैद्यकीय/आरोग्य, कला, सांस्कृतिक, पर्यावरण, रोजगार निर्मिती, पत्रकारिता, कृषी, उद्योग, सहकार, लोकप्रतिनिधी किंवा महिला व युवा सशक्तीकरण या क्षेत्रांत आपले अमूल्य योगदान दिले असल्यास आपले प्रस्ताव सादर करावेत. हे पुरस्कार वयाचे बंधन न ठेवता केवळ व्यक्तीच्या कर्तृत्वाला व समर्पणाला पाहून प्रदान केले जातात.निवड झालेल्या सन्माननीय मान्यवरांना आकर्षक स्मृतीचिन्ह आणि सन्मानपत्र सोबत श्रीफळ आणि स्नेहपुष्प देऊन अत्यंत सोहळापूर्वक सन्मानित करण्यात येईल.आपल्या प्रस्तावासोबत केवळ आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित (Attested) झेरॉक्स प्रती जोडाव्यात. (कृपया मूळ कागदपत्रे जोडू नयेत, तसेच सादर केलेली कागदपत्रे प्रतिष्ठानकडे जतन केली जातील, ती परत मिळणे शक्य होणार नाही याची नोंद घ्यावी). प्रस्तावासोबत आपला सविस्तर परिचय (बायोडाटा), तसेच एक फोटो अर्जावर चिकटवून व एक फोटो सोबत जोडून पाठवावा.आपल्या कार्यास अधिक बळ देण्यासाठी पत्रकार, शिक्षक,मुख्याध्यापक, संपादक, सरपंच किंवा प्रतिष्ठित व्यक्तींचे शिफारसपत्र जोडल्यास उत्तम,मात्र ते बंधनकारक नाही. पुरस्कारासाठी अंतिम निवड करण्याचा निर्णय प्रतिष्ठानच्या निवड समितीकडे सुरक्षित राहील. आपले सन्माननीय प्रस्ताव स्वीकृत करण्याची अंतिम तारीख ५ जुलै (सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत) निश्चित करण्यात आली आहे.सादर प्रस्तावासाठी प्रवेश सहकार्य शुल्क ₹ २,०००/- असून, ते मोबाईल क्रमांक ८८९८३३४५८० वर व्हाट्सप किंवा स्कॅनिंग कोड/ पेटीएमद्वारे सुलभतेने जमा करता येईल.निवड झालेल्या मान्यवरांना दूरध्वनी अथवा पत्राद्वारे अत्यंत आदराने कळविले जाईल.

संपर्क व पत्रव्यवहाराचा पत्ता:

अॅड.सुनील भार्गवराम शिर्के.,संस्थापक/अध्यक्ष: शिर्के जनकल्याण प्रतिष्ठान: स्वप्न को-ऑप.हाऊसिंग सोसायटी, प्लॉट नं. १०७/३, सेक्टर-१, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग,चारकोप,कांदिवली (पश्चिम),मुंबई - ४०० ०६७. भ्रमणध्वनी (Whatsapp): ८८९८३३४५८० / ७७३८३००१५७. ईमेल:shirkejankalyanpratishthang-mail.com /sbshirke63@gmail.com

## कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग शिबिराचे आयोजन

# योग साधनेमुळे शरीर निरोगी बनते : मल्लिकार्जुन मसुती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : मन, मेंदू आणि मनगट सुदृढ ठेवण्यासाठी योगाची गरज आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी योग विद्या आत्मसात करून ध्यानधारणा केल्यास, एकाग्रता वाढून त्यांची शैक्षणिक प्रगती होते आणि शरीर निरोगी बनते असे मत मल्लिकार्जुन मसुती यांनी व्यक्त केले.

कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात रविवार दि २१ जुन रोजी जागतिक योग दिनानिमित्त आयोजित केलेल्या योग शिबिरात विद्यार्थ्यांसमोर ते बोलत होते. यावेळी मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी,सेमी विभाग प्रमुख



रूपाली शहा, जूनियर विभाग प्रमुख पूनम कोकळगी उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, प्राचीन काळापासून भारतात योगाचा अभ्यास सुरू आहे. चांगल्या आरोग्यासाठी सध्या योग आणि प्राणायाम करण्याची गरज आहे. योग साधनेमुळे शरीर सुदृढ होते म्हणून विद्यार्थ्यांनी देखील दररोज योगाचा अभ्यास केला पाहिजे. परंतु दुर्दैवाने आज सर्वजण मोबाईल, लॅपटॉप यांच्या आहारी गेले आहेत. त्यामुळे व्यायामाकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे म्हणून विद्यार्थ्यांनी योग विद्येची आराधना केली पाहिजे.

यावेळी योग व प्राणायामचे प्रशिक्षण व माहिती योगशिक्षक चंद्रकांत बिराजदार यांनी दिले,

या शिबिरास सेमी विभागाचे दिगंबर जगताप, पर्यवेक्षक सिद्रामप्पा पाटील, प्राथमिकचे मुख्याध्यापक सुरेश आवटे, राजकुमार गवळी, रवीकिरण दंतकाळे, पूजा कडबगावकर, मल्लिनाथ जमखंडी, मनीषा दूधभाते आदी शिक्षक उपस्थित होते.

सूत्रसंचालन कल्पना स्वामी यांनी केले तर आभार निशिगंधा कोळी यांनी मानले .

# आदित्य आत्माराम रणदिवे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ईटकुर प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील ईटकुर येथील वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष, तरुणाचे प्रेरणास्थान असणारे, सद्या कळंब येथे अजिंक्य मल्टीसर्विसेस या नावाने दुकान असून ते सर्व प्रकारची ऑनलाइन कामे करत होते.

अशा या २५ वर्षाच्या आदित्य आत्माराम रणदिवे यांचे दि.१९ वार शुक्रवार या दिवशी दुपारी २:३० च्या दरम्यान हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पाश्चात आई, वडील आणि एक भाऊ असा त्यांचा परिवार आहे. घराला घरपण देणाऱ्या आदित्याच्या निधनाने पूर्ण कुटुंबाला, उपासमारीची वेळ आली आहे. आदित्याचा कळंब तालुक्यात मोठा मित्र परिवार होता, त्याच्या जाण्याने समाजाचे व मित्र परिवाराचे फार मोठे नुकसान झाले आहे.आदीत्याच्या जाण्याने पूर्ण तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.



अशा या प्रत्येक सामाजिक कामात पुढाकार घेऊन काम करणाऱ्या, आणि तरूणांचे प्रेरणास्थान असणाऱ्या या होतकरू तरुणाच्या आत्म्यास शांती लाभो हीच महात्मा गौतम बुद्धांच्या चरणी प्रार्थना, आदित्य बाळा तुला भावपूर्ण श्रद्धांजली.

# आंतरराष्ट्रीय १२ वा योग दिन उत्साहात साजरा; निरोगी वृद्धत्वासाठी योग आवश्यक

## नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक तसेच मानसिक आरोग्य चांगले राहते



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जिल्हा प्रशासनातील विविध अधिकारी कर्मचारी तसेच नागरिकांनी प्राणायाम आणि ध्यानधारणेचे प्रात्यक्षिके केली. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक तसेच मानसिक आरोग्य चांगले राहते आणि निरोगी वृद्धत्वासाठी योग आवश्यक आहे, असा संदेश यावेळी सर्व उपस्थित मान्यवरांनी योग प्रात्यक्षिके करून दिला.

१२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आज २१ जून २०२६ रोजी जिल्हा क्रीडा कार्यालय, जिल्हा प्रशासन, मेरा युवा भारत आणि जिल्हा योग्य समन्वय समिती यांच्या संयुक्त विद्यमाने योग दिनाचे आयोजन करण्यात आले. हरीभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर सकाळी ७ वाजता हा कार्यक्रम सुरू झाला. या कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन तहसीलदार पूनम दंडेले यांच्या हस्ते करून योग दिनाचा कार्यक्रम सुरू करण्यात आला.

यावेळी जिल्ह्यातील विविध योग संस्था, पतंजली योगपीठ, भारतीय योग संस्था, विवेकानंद केंद्र, योग सेवा मंडळ, योग साधना मंडळ, योग प्रभा मंडळ, गीता परिवार सर्व कल्याण योग, सर्वोदय योग साधना मंडळ, योग असोसिएशन सोलापूर, भारत स्वाभिमान ट्रस्ट आदी संस्थांच्या प्रतिनिधींनी नागरिक, विद्यार्थी, अधिकारी आणि योगप्रेमींसह मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

**जिल्हा प्रशासनातील शेकडो अधिकारी कर्मचारी तसेच नागरिकांनी प्राणायाम आणि ध्यानधारणेची प्रात्यक्षिके केली**



सर्वप्रथम आयोजकांच्या वतीने उपस्थित योग संस्थांनी शंखवादन व योग प्रार्थना करून मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली. प्रथम योगगुरू म्हणून लता रेवनसिद्ध, माळगे, मधुकर सुतार, मिलिंद वाईकर, भगवान बनसोडे आणि विशाखा मॅडम यांना योगगुरू ही पदवी देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

योग सेवा मंडळाच्या प्रशिक्षकांनी उपस्थितांना विविध प्राणायाम आणि ध्यानधारणेचे प्रात्यक्षिक करून मार्गदर्शन केले. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक तसेच मानसिक आरोग्य चांगले राहते, आणि निरोगी वृद्धत्वासाठी योग आवश्यक आहे, असा संदेश यावेळी देण्यात आला.

या कार्यक्रमात विविध योगासनांचे महत्त्व, निरोगी जीवनशैली आणि योगामुळे होणारे फायदे याबाबत माहिती देण्यात आली. उपस्थितांनी सामूहिक योगाभ्यास करून योग करा, निरोगी रहा हा संदेश दिला.

कार्यक्रमास जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश मोहारे, शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद कादर शेख, तालुका क्रीडा अधिकारी राहुल गायकवाड, जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहाय्यक शंकर कांबळे, तहसीलदार पूनम दंडेले, योगगुरू मनमोहन भुतडा, शाळा समिती अध्यक्ष एच.डी. मंकणी, क्रीडा अधिकारी मनपा नादिर शेख, तसेच विविध योग मंडळांचे प्रशिक्षक रघुनाथ क्षीरसागर, विद्या होनमुरे, अशोक गरड व अधिकारी-कर्मचारी, योग शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, स्काऊटचे विद्यार्थी आणि नागरिक उपस्थित होते.

## सोलापूर जिल्ह्यातील सात हजार शेतकऱ्यांना कर्जमाफीचा १२८ कोटीचा लाभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्रामध्ये आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना शासनाने दोन लाख रुपयांची कर्जमाफी केली आहे. यासाठी नेम वाटी घालण्यात आले असल्यामुळे सोलापूर जिल्ह्यात या योजनेपासून १६००० शेतकरी वंचित राहिले असल्याचे दिसून येत आहे. तरी या योजनेचा लाभ ७५७६ शेतकऱ्यांना मिळाला असून त्यांना १२८ कोटी मिळणार आहे.

लोकसभेमध्ये निवडणुकीत महायुती शासनाला मिळावी तशी यश मिळाले नाही म्हणून विधानसभा निवडणुकीच्या निवडणुकीसाठी मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण ही योजना सुरू केली किंवा योजना अंतर्गत महिलांना महिन्याला पंधराशे रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच शेतकऱ्यांना कर्जमाफी करण्यात येईल अशी घोषणा केली. हीच लाडकी बहीण व शेतकऱ्यांनी माहितीला मतदान केले. म्हणून पुन्हा सत्तेवर महायुती आली. मात्र नेत्यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफी करण्याची कडे दुर्लक्ष केली. त्यामुळे शेतकऱ्यांमधून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला.

विरोधी पक्षातील नेत्यांनी सरकारला शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयी धारेवर धरले नंतर शासनाने शेतकऱ्यांना दोन लाख रुपये पिक कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला. मात्र यासाठी नियम अटी घालण्यात आले आहेत. त्यामुळे १६००० शेतकरी ह्या कर्जापासून वंचित राहणार आहेत.

## उल्हासनगरातील पाच आंबेडकरवादी सामाजिक कार्यकर्त्यांनी वकील पद प्राप्त करून घडवला मानाचा तुरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उल्हासनगर : बाळासाहेब अहिरे. यश सिद्धी न्यूज नेटवर्क सामाजिक चळवळीमध्ये सक्रिय सहभाग घेऊन फुले-शाहू-आंबेडकर विचारधारेचा प्रसार करणाऱ्या पाच मान्यवरांनी वकील पद प्राप्त करून समाजासमोर एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या यशाबद्दल विविध स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

वकील पद प्राप्त करणाऱ्यांमध्ये उल्हासनगर महानगरपालिकेच्या महापौर अश्विनीताई कमलेश निकम, वंचित बहुजन आघाडीचे युवा अध्यक्ष




भरत तानाजी रणदिवे, अशोका फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शिवाजी दादा रगडे, वंचित बहुजन महिला आघाडीच्या अध्यक्षा रेखाताई संदीप उबाळे तसेच सुरेखाताई सुखदेव पैठणे यांचा समावेश आहे.

सामाजिक, शैक्षणिक व जनहिताच्या विविध प्रश्नांवर सातत्याने कार्य करणाऱ्या या सर्व मान्यवरांनी कायद्याचे शिक्षण पूर्ण करून वकील पद प्राप्त केले आहे. त्यामुळे समाजातील वंचित, शोषित आणि गरजू घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांच्या कार्याला अधिक बळ मिळणार असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.या यशामुळे उल्हासनगर शहरासह आंबेडकरवादी चळवळीमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरातून त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

## सोलापूर जिल्ह्यात लाच घेण्यासाठी महसूल व पोलीस खाते आघाडीवर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : शासकीय कर्मचाऱ्यांना चांगला पगार असून देखील लाज घेतल्याशिवाय कामे केली जात नाही त्यामुळे लाचखोर अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी शासनाने लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची स्थापना केली आहे या विभागामार्फत लाज घेणाऱ्या वर करडी नजर ठेवण्यात येते, सोलापूर सोलापूर जिल्ह्यात दोन वर्षात ६४ कारवाया करण्यात आल्या असून यामध्ये ८६ जनावर गुन्हे दाखल करण्यात आले आहे त्यामध्ये पोलीस व महसूल विभाग आघाडीवर असल्याचे दिसून येत आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी एका कार्यक्रमांमध्ये नागरिकांच्या मालमत्तेची संरक्षण व पोलीस महसूल विभाग करत असल्याने सांगितले आहे मात्र प्रत्यक्षात या दोन विभागाकडून नागरिकांची लूट केली जात असल्याची समोर येत आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये लाचलोत्पात विभागाने २०२४ २७ कारवाया करून ३५ अधिकारी व कर्मचाऱ्यावर गुन्हे दाखल केले आहे. २०२५ सालामध्ये २४ कारवाया करून ३० कर्मचारी व अधिकार्यावर गुन्हे दाखल केले आहे. जानेवारी ते जून २०२६ या कालावधी कालावधीमध्ये तेरा कारवाया करून २१ जनावर अधिकारी व कर्मचाऱ्यावर गुन्हे दाखल केले आहे. लाज घेणाऱ्यांमध्ये महसूल व पोलीस कर्मचारी सोलापूर जिल्ह्यामध्ये आघाडीवर दिसत आहे.

## मुलांना दर्जेदार शिक्षण घेण्यासाठी जिल्हा परिषद शाळेतच प्रवेश घ्या : भाई शरद सरकटे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सन २०२६ जुन महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात जिल्हा परिषदेच्या शाळा सुरू होत असलेल्या सिंदखेडराजा तालुक्यातील सायाळा येथील जिल्हा परिषद शाळेतच पालकांनी आपल्या मुलांचा प्रवेश निश्चित करावा.असे आव्हान सामाजिक कार्यकर्ते भाई शरद सरकटे यांनी आव्हान केले आहे.

स्पर्धेचे युग असतांना सुध्दा त्या स्पर्धेत जिल्हा परिषद शाळा सुरू ठेवण्यासाठी.व गौर गरीबांच्या मुलांना प्राविट शाळेत शिकण्यासाठी.अर्थिक अडचणी भासवत असल्याने त्या भासू नयेत या अनुषंगाने. महाराष्ट्र शासनाकडून शालेय विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके गणवेश.व शिक्षण हि दर्जेदार मिळते .व शिक्षण माध्यमातल्या योजनेचाही लाभ मिळावा या साठी. पालकांनी आपल्या पाल्यांचा प्रवेश निश्चित करावा. जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांची भरती स्पर्धा परिक्षेतुन होते . त्यामुळे शिक्षणाचा दर्जा चांगला असून. गुणवत्ता पुर्ण मिळते.जिल्हा परिषद



शाळेतील शिक्षक मेहनत आणि परिश्रम विद्यार्थ्यांच्या दर्जेदार शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी परीश्रम घेताना दिसत आहे. जिल्हा परिषद शाळा स्पर्धेच्या युगात पटसंख्येमुळे माघे पडत असून. खाजगी शाळेत कर्मचारी व बलाढ्य पैस्यावाल्यांचे मुलें शिक्षण घेत असून.सर्व सामान्यांच्या मुलांना फि भरुन शिकता येते नसल्याने कुठे ही खचून न जाता जिल्हा परिषद शाळा वाचवण्यासाठी व जिल्हा परिषद शाळेत दर्जेदार शिक्षण घेण्यासाठी पालकांनी आपल्या पाल्यांचा प्रवेश निश्चित करावा असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते भाई शरद सरकटे यांनी आव्हान केले आहे.

**यशासाठी कठोर परिश्रमासोबत सातत्य आवश्यक - नगराध्यक्ष प्रथमेश म्हेत्रे**

## समर्थ प्रतिष्ठानच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : तांत्रिक व उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात यश संपादन करण्यासाठी कठोर परिश्रम आवश्यक असून, कोणत्याही क्षेत्रात दीर्घकालीन यश मिळवण्यासाठी सातत्य हा महत्त्वाचा गुण आहे, असे प्रतिपादन दुधनी नगरपालिकेचे नगराध्यक्ष प्रथमेश म्हेत्रे यांनी केले.

समर्थ प्रतिष्ठान, अक्कलकोटच्या वतीने आयोजित दहावी, बारावी तसेच जेईई, सीईटी, डिप्लोमा आदी विविध शाखांतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

प्रा. संतोष पवार सर यांनी करिअर विषयी मार्गदर्शन करून शिक्षणात परिस्थिती आडवी येत नाही फक्त गुणवत्ता असली पाहिजे ते प्राप्त करणे साठी जिद्द, चिकाटी व अभ्यासातील सातत्य पाहिजे असे सांगितले.

डिप्लोमा कॉम्प्युटर इंजिनिअरिंग शाखेत ९४.१२ टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या कु. सोमनाथ सूर्यकांत कडबगांवकर यांचा



समर्थ प्रतिष्ठानच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास मैंदर्गीच्या नगराध्यक्षा अंजली बाजारमठ, श्री स्वामी समर्थ मंदिर समिती चे अध्यक्ष महेश इंगळे, उपनगराध्यक्ष बंटी राठोड, लायन्स क्लब चे माजी प्रांतपाल राजशेखर कापसे, समर्थ प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेश हिंडोळे, नगरसेवक रमेश कापसे, तम्मा शेळके, अशोक जाधव, ज्येष्ठ नेते मल्लिनाथ स्वामी, संगमेश्वर महाविद्यालयाचे प्रा. संतोष पवार, प्रशांत शिंपी, दयानंद बिडवे, दिलीप महिंद्रकर, श्रीकांत झिपरे, प्रदीप हिंडोळे सर,शिवशरण इचगे, जाधव सर,आंदोडगी सर, सत्यजित लोके सर ,अनिल बिडवे,जगदीश शेटे तसेच युवा नेते राहुल बकरे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी समर्थ प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेश हिंडोळे , दयानंद बिडवे, अप्पू संगापुरे,श्रीकांत झिपरे,राजू एकबोटे,रवी वाघमोडे,अरुण शिंदे, ओम् जिरगे, व त्यांच्या संपूर्ण टीमने विशेष परिश्रम घेतले.

## हन्नूर येथील अनंत चैतन्य प्रशालेत योगादिन साजरा

**सर्वे सन्तु सुखिना , सर्वे सन्तु निरामया हा योगाचा मुख्य उद्देश. आरोग्य, आत्मशुद्धी, आणि मन: शांतीचा सशक्त मार्ग म्हणजे योग म्हणून प्रशालेच्या प्रांगणात १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हन्नूर : महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था, अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य प्रशाला, हन्नूर येथे अत्यंत प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. प्रारंभी प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. ज्ञानदेव शिंदे यांच्या हस्ते भारत मातेच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यानंतर प्रशालेतील शिक्षक शहाजी माने, राजेंद्र यंदे, मल्लमा चपळगाव, स्वप्नाली जमदाडे यांनी आजच्या आंतरराष्ट्रीय जागतिक दिनाच्या निमित्ताने प्रशालेत आयोजित योगाभ्यासाचे महत्त्व पटवून



देऊन विद्यार्थ्यांना नियमित योग व प्राणायाम करण्याचे आवाहन केले.व प्रशालेचे योगशिक्षक पर्यवेक्षक सुरेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना योगाभ्यासाचे धडे देण्यात आले. यावेळी प्रशालेतील मृदुलादेवी स्वामी, अप्पासाहेब काळे, धनंजय जोजन, शशिकांत अंकलगे, सागर मठदेवरु, अजीज मुल्ला, प्राध्यापक कालीबत्ते व काशिनाथ पाटील सर्व शिक्षक बंधू- भगिनी शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

प्रशालेत आयोजित योग शिबिराचे संस्थेचे अध्यक्ष व आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी, संस्थेचे जेष्ठ संचालक व मार्गदर्शक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्रशालेचे माजी प्राचार्य तथा आधारवड सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, संस्थेच्या संचालिका व जि. प. सदस्या शांभवीताई कल्याणशेट्टी, उपसभापती सागरदादा कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसुती,शिक्षण विभाग प्रमुख रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख पुनम कोकळगी यांनी विद्यार्थ्यांचे तसेच योग मार्गदर्शक शहाजी माने व योग प्रशिक्षक सुरेश जाधव यांचे कौतुकासह अभिनंदन केले.